# प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे

# "माहात्म्य"

## (देवता आणि स्थल)

## हस्तलिखितांचे प्रदर्शन

मंगळवार दि.६ फेब्रुवारी २०१८
ते
मंगळवार दि.२० फेब्रुवारी २०१८

ठाणे महानगरपालिका उर्दू शाळा क्र. ३२/१२६ जवळ,
हाजुरी दर्गा रोड, हाजुरी, ठाणे (प.) - ४०० ६०४
दूरध्वनी : ०२२-२५८२ ५८४०/४१
Email : orientalstudy@gmail.com
Website : www.orientalthane.com

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. **प्रस्तावना** | – डॉ. विजय बेडेकर | ३ |
| २. **हस्तलिखित 'माहात्म्य'** | | ५ |
| ३. **छापील 'माहात्म्य'** | | १३ |
| ४. **'माहात्म्या'वर आधारित पुस्तके** | | १८ |
| ५. **'माहात्म्य' साहित्य प्रकाराचे महत्त्व** | – सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | २० |
| ६. **Multi-dimensional Utility of Mahatmya Literature** | - Dr. Prabhakar Apte | २८ |

# प्रस्तावना

प्राच्यविद्या अभ्यास संस्थेने गेल्या ३५ वर्षांत (१९८२ ते २०१७) कोष वाङ्मयापासून ठाण्याच्या इतिहासापर्यंत अनेक विषयांवर प्रबोधनात्मक प्रदर्शने भरवली आहेत.

यावर्षी (मंगळवार, ६ फेब्रुवारी ते मंगळवार २० फेब्रुवारी २०१८) ''माहात्म्य'' या महत्त्वाच्या पण संशोधनामधे दुर्लक्ष झालेल्या विषयावर हे प्रदर्शन भरवत आहोत. देवता माहात्म्यांपासून स्थल माहात्म्यांपर्यंत अनेक माहात्म्य मूळ संस्कृतमधे लिहिली गेली. कालांतराने त्याची प्राकृतमधेही भाषांतरे झाली. 'देवता माहात्म्य' आजही व्रतवैकल्याचेवेळी अनेक घरांतून म्हंटली जातात; म्हणून ती मोठ्या प्रमाणावरती उपलब्धही आहेत. 'स्थल माहात्म्यां'च्या बाबतीत मात्र दुर्दैवाने खूपच दुर्लक्ष झाले आहे. ही सगळीच माहात्म्य ही माहितीचा फार मोठा स्रोत आहेत.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात देशी, तसेच अनेक विदेशी अभ्यासकांनी या साहित्य प्रकारावर संशोधन करायला सुरवात केली. उत्तरेकडील बहुतेक महत्त्वाची तीर्थक्षेत्रे आणि शहरांचा, माहात्म्यांच्या माध्यमातून अभ्यास केला गेला. लायडन, हॉलंड येथून १९९० साली Hans Bakker यांनी संपादित केलेल्या "The History of Sacrad Places in India as Reflected in Traditional Literature" या संशोधनपर ग्रंथाने या विषयाला एक वेगळा आयाम दिला. अनेक संशोधकांनी माहात्म्यावर आधारित लेख त्यामध्ये लिहिले आहेत.

पाश्च्यात्य विद्यापीठांमधून प्राच्यविद्या (Oriental Studies), विशेषतः भारतशास्त्राच्या (Indology) संशोधनामधे पुन्हा एकदा या साहित्याला महत्त्व प्राप्त झाले. २००७ साली अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठामधून Smith Travis LaMar यांनी "The Sacred Center and Its Peripheries : Saivism and the Varanasi Sthala-Puranas" हा प्रबंध लिहून हे साहित्य आणि या विषयाचे गांभीर्य पुन्हा एकदा दाखवून दिले. २०१६ साली Andrea Marion Pinkeny यांनी "An Ever-Present History in the Land of Gods : Modern Mahatmya Writing on Uttarakhand" (Internation Journel of Hindu studies, 2013, Vol. 17 issue 3 p.p. 229-260) हा संशोधन निबंध लिहून उत्तराखंडामधील तीर्थक्षेत्रांच्या इतिहासावर बरीच नवीन माहिती

उपलब्ध करून दिली. या विषयावरील व्यापक संशोधना करिता असे प्रबंध आणि शोधनिबंधांची सूची तयारच व्हायला हवी.

महाराष्ट्रामधेही दासगणू ते दुर्गा भागवतांपासून, रा. चिं. ढेरेंपर्यंत सर्वांनी माहात्म्यांचा संशोधन आणि लिखाणामधे खूप वापर केलेला दिसतो. Anne Feldhaus या पाश्चात्य विदुषीने भीमा, गोदावरी, कृष्णा, तापी या नद्यांच्या माहित्यांवरुन त्यांच्या तीरावरील शहरं आणि लोकजीवनावरती महत्त्वाचे संशोधन करून ठेवले आहे.

Susan Gole या विदुषींनी तीर्थक्षेत्र आणि देवदेवतांविषयी लिहिलेल्या साहित्यातून Indian Maps and Plans : From Earlier Times to the Advent of European Surveys (1989) हे पुस्तक लिहून भारतीयांच्या भौगोलिक आणि नकाशाशास्त्रावरील माहितीवर उपयुक्त प्रकाश टाकला आहे.

माहात्म्य, विशेषतः स्थल माहात्म्य ही तत्कालीन सांस्कृतिक, सामाजिक आणि भौगोलिक माहितीचा स्रोत देणारी महत्त्वाची साधने आहेत. इतिहासाच्या लिखाणाकरता तर ती अत्यंत उपयुक्त आहेत.

प्राच्यविद्येच्या ग्रंथालयात आज ३५०० हून अधिक हस्तलिखिते उपलब्ध आहेत. त्यातली या विषयावरील मोजकी लिखिते आणि छापील, तसेच याच विषयावरील काही पुस्तकेही या प्रदर्शनामधे मांडली आहेत.

या हस्तलिखितांची भाषा वाचकांच्या सोयीसाठी मुद्रित प्रतीत आजच्या प्रथेप्रमाणे सुधारली आहे.

अभ्यासक आणि संशोधकांना याचा फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

**– डॉ. विजय बेडेकर**

•••

# हस्तलिखित माहात्म्य

हस्तलिखित म्हटले की सामान्यपणे पोथीच्या स्वरूपातले जुने धार्मिक ग्रंथच आपल्या डोळ्यांसमोर येतात. वस्तुतः हाताने लिहिलेला कोणताही मजकूर म्हणजे हस्तलिखित. भारतीय टपाल खात्याच्या व्याख्येप्रमाणे यंत्राच्या साहाय्याने न लिहिलेला अथवा प्रत न केलेला कोणताही मजकूर म्हणजे हस्तलिखित मजकूर होय. अर्थातच हस्तलिखिताला भाषा, लिपी, विषय यांच्या मर्यादा असण्याचे कोणतेही कारण नाही. हाताने लिहिलेले धार्मिक आणि धार्मिकेतर ग्रंथ, पत्रे, याद्या, करारनामे इत्यादी विविध प्रकारच्या कागदपत्रांना हस्तलिखित म्हणणे योग्य होईल. हस्तलिखित संरक्षण–शास्त्राच्या दृष्टीने मात्र त्यात जुने आणि नवीन असा भेद करणे इष्ट ठरते. सुमारे पंच्याहत्तर वर्षांपूर्वी हाताने लिहिलेला कोणताही सांस्कृतिक महत्त्वाचा मजकूर म्हणजे हस्तलिखित असे मानण्याची या शास्त्राची प्रथा आहे. अशा जुन्या मजकुरांचे संरक्षण करणे अधिक अगत्याचे आहे.

**व्याख्या:** हस्तलिखित याचा अर्थ दोन शब्दात विभागला आहे. हस्त (म्हणजे हात) + लिखित (केलेले लिखाण) = हस्तलिखितला म्हणजेच हाताने लिहिलेला मजकूर.

## १. कार्तिक माहात्म्य

शके १७३९ सन १८१७ शुक्ल नामसंवत्सरे आश्विन महिन्याच्या शुद्ध अष्टमीला मंगळवारी गोपीनाथ रघुनाथ घोसाळकर या उपाध्यांनी कार्तिक माहात्म्य लिहिले आहे. हे माहात्म्य सनत्कुमार संहिता या ग्रंथातून घेतली आहे. या पोथी मध्ये कार्तिक माहात्म्य चे २६ अध्याय आहेत.

या पोथीमध्ये कार्तिक मासाचे माहात्म्य सांगितले आहे. कार्तिकातल्या कृत्यांत कार्तिकस्नान व दीपदान या दोन कृत्यांना विशेष महत्त्व दिलेले आहे. त्याबद्दलची माहिती यात सविस्तर सांगितली आहे. कार्तिकमासात वेगवेगळ्या तिथीस भिन्न भिन्न देवतांना उद्देशून कृत्ये सांगितली आहेत. उदा. शुद्ध प्रतिपदा – बलिप्रतिपदा. बळीची पूजा, गोवर्धन पूजा.

## २. भागवत माहात्म्य

या पोथीमध्ये  लेखकाचा उल्लेख सापडत नाही. संस्कृत १७५८ सन १८३६ गुरू मुख्यनाम संवत्सरे फाल्गुन शुक्ल पौर्णिमेला लिहून झाला. या पोथीमध्ये भागवत माहात्म्या बद्दल ६ अध्याय आहेत.

भागवत माहात्म्य हे संस्कृत साहित्यातील एक अनमोल रत्न आहे. ही पोथी फार मोलाची आहे. यातील काही विचार तर अध्यात्म आणि भक्ती यांच्या क्षेत्रात अत्यंत उच्च आहे. भागवतातील अशा विचारांचा अभ्यास केला की वाटते, जिवंत धार्मिक अनुभवांचा तो आविष्कार आहे. या पोथीमध्ये एकूण सहा अध्याय आहेत. त्यात खालील प्रमाणे माहिति दिलेली आहे.

पहिल्या अध्यायात भक्ती आणि नारद यांचा संवाद आहे. दुसऱ्या अध्यायात सनदकुमार आणि नारद यांचा संवाद आहे. यामध्ये नारदाने  ज्ञान यज्ञाचे महत्त्व सांगितलेले आहे. तिसऱ्या अध्यायात नारदांनी भक्तीचे निरूपण केले आहे. चौथ्या अध्यायात विप्रमोक्ष. ब्राह्मणाला कशी मुक्ती मिळावी हे सांगितले आहे. पाचव्या अध्यायामध्ये गोकर्ण महाबळेश्वर सांगितले आहे. सहाव्या अध्यायात भागवताचे श्रवण, कथन, कीर्तन सांगितलेले  आहे.

## ३. एकादशी माहात्म्य

या पोथीच्या लेखकाचा उल्लेख यात केलेला नाही. या पोथीचा कालावधीसुद्धा यात नमूद केलेला नाही.

प्रत्येक मासातील शुक्ल व कृष्णपक्षातील ११ वी तिथी. ही विष्णुची तिथी मानलेली आहे. या दिवशी उपवास करून दुसऱ्या दिवशी त्यांची पारणा करतात.

या पोथीमध्ये श्रीकृष्णाने युधिष्ठिराला एकादशी चे महत्त्व सांगितले आहे. श्रीकृष्णाने मांधाता ऋषी यांचा संवादातून एकादशीचे महत्त्व वर्णन केले आहे. या पोथीमध्ये वेगवेगळ्या संदर्भ पुराणातून प्रत्येक एकादशीचे माहात्म्य एकत्रित करून लिखाण केले आहे. त्यांची सविस्तर माहिती या पोथीमध्ये दिलेली आहे. तसेच प्रत्येक एकादशीचे कथा-स्वरूप दिले आहे. प्रत्येक मासात दोन, याप्रमाणे वर्षाच्या २४ एकादशा येतात. त्यांची नावे पुढीलप्रमाणे-

शुक्लपक्ष – कामदा, मोहिनी, निर्जला, शायनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धनी, जयदा व आमलकी.

कृष्णपक्ष – पापमोचिनी, वरुथिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया.

## ४. मार्गशीर्ष माहात्म्य

या पोथीच्या लेखकाचा उल्लेख यात केलेला नाही. या पोथीचा कालावधीसुद्धा यात नमूद केलेला नाही. या पोथीचे एकूण २३ अध्याय आहेत.

हिंदू कालगणनेनुसार मार्गशीर्ष हा नववा महिना असून या महिन्याच्या पौर्णिमेस चंद्र मृग नक्षत्रासमीप असतो, म्हणून या महिन्याला मार्गशीर्ष हे नाव पडले. शिवाय 'मासानाम् मार्गशीर्षोऽहम्' असे भगवतगीतेत म्हटले आहे, यावरून याचे विशेषत्व लक्षात येते.

या पोथीमध्ये श्री हरीचे माहात्म्य, एकादशी माहात्म्य, यमुना नदीचे महत्त्व सांगितलेले आहे. एकादशीपासून पाच दिवस पूजा करावी. हे व्रत सर्व पापहर असून सर्व दुःखांचा नाश करते असे या पोथीमध्ये सांगितले आहे. यामध्ये मासाच्या प्रत्येक दिवसाचे महत्त्व सविस्तर सांगितलेले आहे.

## ५. वैशाख मास माहात्म्य

या पोथीचे लिखाण गुजरातमधील पाटण शहरात राहणाऱ्या श्री ब्राह्मण नारायण मावजी ओझा याने केलेले आहे. या पोथीचे लिखाण सन १८३८ शके १७६० पौष मास या काळात झाले आहे. या पोथीमध्ये एकूण १२ अध्याय आहेत.

या मासातील पौर्णिमा विशाखा नक्षत्राने युक्त असते, म्हणून याला वैशाख म्हणतात. या मासाचे प्राचीन नाव माधव असेही आहे. या पोथीमध्ये या मासातील व्रत–वैकल्ये या बद्दलची माहिती सांगितलेली आहे.

या पोथीमध्ये या मासातील प्रात:स्नान विशेष पुण्यप्रद आहे. तसेच या मासातील तृतीया, चतुर्दशी व पौर्णिमा या तिथी विशेष पवित्र मानल्या जातात. तृतीयेला अक्षय्य तृतीया म्हणतात. कारण या दिवशी केलेले दान, हवन इ. कृत्ये अक्षय्य होतात.

पौर्णिमेला दानधर्म केला असता विशेष पुण्य लाभते. या व्यतिरिक्त वैशाख शुद्ध सप्तमीला गंगेची पूजा करावी असेही सांगितले आहे. वैशाख मासात जलदान करावे. पादत्राणे, छत्रे, तलम वस्त्रे, चंदन इ. दान करावे.

या पोथीमध्ये नारद अमरिष याला अश्वमेध महत्त्व सांगत आहे. तसेच स्थान माहात्म्य सांगताना यात मुनीशर्मा या ब्राह्मणाची कथा सांगितली आहे. तसेच यम व ब्राह्मणाचा संवाद सांगितला आहे.

## ६. अयोध्या माहात्म्य

या पोथीचे लिखाण मन्साराम रामप्रसाद त्रिपाठी यांनी सवंत १८१२ ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेला मंगळवारी पूर्ण केले आहे. या पोथीचे लिखाण ९ अध्यायात केलेले आहे.

अयोध्या नगरी पवित्र मानली जाते. तिला 'रामाची अयोध्या' ही म्हटले जाते. अयोध्या कोसल देशाच्या अंतर्गत आहे असे वाल्मिकीने सांगितले आहे. या पोथीमध्ये एकूण ९ अध्याय आहेत. यामध्ये पहिल्या अध्यायात उमा आणि शंकरांचा संवाद अयोध्येचे माहात्म्य सांगताना आहे. तसेच दुसऱ्या अध्यायात अयोध्येचे वर्णन केलेले आहे.

## ७. मलमास माहात्म्य

हे हस्तलिखित शके १७१२ साधारण संवत्सरातील अधिक आषाढ शुद्ध पंचमीला गोविंद भावे यांनी लिखाण केले आहे. या पोथीमध्ये २ अध्याय आहेत. पहिली चार पाने काळ्या शाईने व ५,६,७ निळ्या शाईने लिहिलेली आहेत.

या पोथी मध्ये मलमासा बद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. मलमास (अधिक मास) यास पुरुषोत्तम मास असेही म्हणतात. या मासाची देवता पुरुषोत्तम म्हणजे विष्णू ही मानली असून, त्यांच्या कृत्यासाठी काही कृत्ये सांगितली आहेत. पूजा, पापक्षालनासाठी मलमास व्रत, प्रत्येक दिवशी अनारसे इ. पक्कान्ने तेहतीस या संख्येने कांस्यपात्रात भरून पात्रासह त्याचे दान, पादत्राणे व छत्री यांचे दान, सुवर्ण दक्षिणा इ. करावे.

## ८. मल्हारी माहात्म्य

या पोथीच्या लेखकाचा उल्लेख यात केलेला नाही. या पोथीचा कालावधीसुद्धा यात नमूद केलेला नाही. या पोथीचे एकूण २२ अध्याय आहेत.

मल्हारी किंवा खंडेराय हे मुख्यत्वे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यातील लोकप्रिय हिंदू दैवत आहे. हे दैवत महाराष्ट्रातील अनेकांचे कुलदैवत आहे. परंपरेने मल्हारी हा शंकराचा अवतार मानला जातो. त्याने मल्लासूर दैत्याचा संहार केला, मल्लाची हार झाली म्हणून मल्ल + हार अशा रीतीने मल्हार हे नाव मिळाले असावे. 'येळकोट येळकोट जय मल्हार' असा या देवाचा जयघोष केला जातो. मल्हारी मार्तंड (मल्लारिमार्तंड) असेही नामाभिधान आहे. मूळ संस्कृतमध्ये या नावाचा उच्चार 'मल्लार' असा आहे. खंडोबाने मणी व मल्ल दैत्यांशी मार्गशीर्ष शुक्ल १ ते ६ अशी सहा दिवस लढाई केली व सहाव्या दिवशी चंपाषष्ठीस दोघांचा वध केला. या सहा दिवसात खंडोबाचा उत्सव साजरा केला जातो. या उत्सवाला 'खंडोबाचे नवरात्र' म्हणतात. 'मल्हारी माहात्म्य' या ग्रंथात बावीस अध्याय आणि ९३० श्लोक आहेत. या अध्यायाची माहिती पुढील प्रमाणे –

| अध्याय | वर्णन |
|---|---|
| १ | मंगलाचरण, मणिचूर्ण पर्वतावरील सप्तऋषींच्या कुटिरांचे वर्णन, मल्लासूर ती कुटिरे उद्ध्वस्त करतो. ऋषी इंद्राकडे जातात. |
| २ | इंद्रदरबाराचे वर्णन, इंद्राची मदत करण्याबाबत असमर्थता, वैकुंठात जाऊन विष्णुची मदत घेण्याचा सल्ला. |
| ३ | वैकुंठाचे वर्णन, ऋषी विष्णुची स्तुती करतात व मदतीची याचना करतात. विष्णू ऋषींसोबत कैलास पर्वतावर येतात. |
| ४ | कैलास पर्वताचे वर्णन, कैलासाची शोभा बघून ऋषी व विष्णू यांना झालेला आनंद. |
| ५ | शंकराच्या महालाचे वर्णन. |
| ६ | शंकर–पार्वती यांच्या दिव्य रूपाचे वर्णन. |
| ७ | ऋषी शंकराची स्तुती करतात, शंकर ऋषीगणांस अभयदान देतो, धृतमरीचा जन्म. |
| ८ | शंकर मार्तंडभैरव अवतार घेतो, देवसैन्याचे वर्णन, युद्धास निघतात. |
| ९ | मल्लासुरास देवसेनेच्या आक्रमणाची खबर मिळते, दैत्यगणांची युद्धतयारी. |

| | |
|---|---|
| १० | युद्धाचे वर्णन. |
| ११ | कार्तिकेय व खंडगदृष्याचे युद्ध, कार्तिकेयाचा विजय. |
| १२ | गणपती व उल्कामुखाचे युद्ध,गणपतीचा विजय; नंदी व कुटिलोमाचे युद्ध, नंदीचा विजय. |
| १३ | मणिदैत्य व खंडोबाचे युद्ध, मणीचा वध. |
| १४ | विष्णू मल्लासुरास समजावण्याचा प्रयत्न करतात, मल्लासूर सल्ला धुडकावून युद्धास जातो. |
| १५ | धृतमरी आणि मल्लासुराचे युद्ध, धृतमरीचा पराभव. |
| १६ | मल्लासुराचे व खंडोबाचे युद्ध, मल्लासुराचा पराभव. |
| १७ | मल्लासुराकडून खंडोबाची स्तुती, खंडोबा मल्लासूरास वर देतो. |
| १८ | ऋषींच्या विनंतीनुसार मणिमल्लांच्या वधस्थळी दोन लिंगे प्रकट होतात, देवगण त्या स्थळी तीर्थयात्रेसाठी येतात. |
| १९ | प्रेमपुरी यात्रेचे महत्त्व, . |
| २० | प्रेमपुरी स्थळाचे वर्णन. |
| २१ | खंडोबाच्या पूजेचे माहात्म्य. |
| २२ | ग्रंथ वाचून मिळणारे फळ. |

## ९. देवी माहात्म्य

देवीच्या उपासकांचा एक प्रमुख ग्रंथ. ही पोथी मार्कंडेय पुराणांतर्गत आहे. यात १३ अध्याय आहेत.

हा ग्रंथ सप्तशती किंवा दुर्गा सप्तशती या नावाने ओळखला जातो. देवी माहात्म्यात महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती या देवींच्या त्रिविध स्वरूपाची चरित्रे सांगितली आहेत. पहिल्या अध्यायात महाकालीचे चरित्र आहे. दुसऱ्या ते चौथ्या या तीन अध्यायात महालक्ष्मी चरित्र आहे. यात प्रामुख्याने महिषासुर वधाची कथा आहे. शेवटच्या नऊ अध्यायात महासरस्वतीचे चरित्र आहे. या भागात प्रामुख्याने शुंभ-निशुंभ वध वर्णन आहे. देवीसूक्त या नावाने प्रसिद्ध असणारा मंत्रसमूह याच भागात आहे. देवीच्या उपासना क्षेत्रात या ग्रंथाचा महिमा विशेष आहे.

## १०. तुलसी माहात्म्य

या पोथीचे लिखाण गुजरातमधील पाटण शहरात राहणाऱ्या श्री ब्राह्मण नारायण मावजी ओझा याने केलेले आहे. शके १७६० सन १८३८ मार्गशीष कृष्ण १० मंगळवारी याचे लिखाण पूर्ण झाले. या पोथीमध्ये १५ अध्याय आहेत.

तुलसी एक पूजनीय वनस्पती आहे. तुळसीचे केवळ दर्शनही पापनाशक असून, तिची पूजा मोक्षदायक आहे. तुलसी ही विष्णुला परम प्रिय आहे. तुळशीच्या दलाशिवाय विष्णुची पूजा केल्यास ती व्यर्थ ठरते. या पोथीमध्ये वेगवेगळ्या पुराणांतून तुलसी माहात्म्य घेतले आहे यांची सविस्तर माहिती आहे. तुळशीचे दर्शन, स्पर्श, ध्यान, नमन, पूजन, रोपण व सेवन या गोष्टी युगायुगांची पातके नष्ट करतात. तुळशीच्या वनस्पतीत मूळापासून अग्रापर्यंत सर्व देवता वास्तव्य करीत असतात, असे सांगितले आहे.

## ११. श्रावण माहात्म्य

ही पोथी कोणत्या काळातील आहे याची माहिती यात उपलब्ध नाही. श्रावण महिना हा हिंदू पंचांगानुसार आणि भारतीय सौर दिनदर्शिकेनुसार पाचवा महिना आहे. या महिन्याच्या पौर्णिमेला किंवा आगे-मागे श्रवण नक्षत्र असते. त्यावरून या महिन्याला ‘श्रावण’ असे नाव मिळाले आहे. सूर्य जेव्हा सिंह राशीत प्रवेश करतो, तेव्हा सौर श्रावण सुरू होतो. श्रावण महिन्याला सर्व व्रतांचा राजा म्हटले जाते. श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा वा व्रत करण्याची परंपरा आहे. श्रावणातील सोमवारी शंकराची पूजा व उपासना करण्याची पद्धत आहे.

या पोथीमध्ये ३० अध्याय आहेत. या पोथीमध्ये तिसऱ्या अध्यायापासून माहिती उपलब्ध होते. स्कंद पुराणातील श्रावण माहात्म्य यातील ईश्वर आणि सनत्कुमार संवाद सांगितला आहे. तिसऱ्या अध्यायात लक्ष पूजा, भूमिशयन सांगितले आहे. तसेच श्रावण मासातील येणाऱ्या सर्व व्रतवैकल्यांबद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. प्रत्येक व्रताची कथा यात सांगितलेली आहे.

## १२. अबुर्द माहात्म्य

स्कन्द पुराणान्तर्गत अर्बुद (अबू) पर्वताचे माहात्म्य वर्णन केले आहे. ही पोथी कोणत्या काळातील आहे याची माहिती यात उपलब्ध नाही. एकूण अध्याय १ ते ५९ आहेत. या सर्व अध्यायांमध्ये निरनिराळ्या तीर्थांचे महत्त्व सांगण्यात आलेले आहे. १ ते ८२ पाने एक लेखकाचे लिखाण आहे. तर ८३ ते १३५ पाने दुसऱ्या लेखकाचे लिखाण आहे. यात ११ अध्याय रूपतीर्थ माहात्म्य सांगितले आहे. १२ अध्याय कोटीश्वर माहात्म्य आहे. तसेच केदार माहात्म्य, यमतीर्थ, नागोदमन, ब्रह्मपद वर्णन, मिश्र तीर्थ कथानक यांची यात सविस्तर माहिती दिलेली आहे. अर्बुद पर्वताशी संबधीत निरनिराळ्या तीर्थांचे महत्त्व व स्थान माहात्म्य वर्णन केले आहे.

## १३. सेतू माहात्म्य व शंभू माहात्म्य (सह्याद्री खंड)

ही पोथी कोणत्या काळातील आहे याची माहिती यात उपलब्ध नाही.

या पोथीमध्ये स्कन्द पुराणातील सह्याद्री खंडातील सेतू माहात्म्य आहे. तसेच ब्रह्मोत्तर खंडातील शंभू माहात्म्य आहे. एकूण २२ अध्याय यामध्ये आहेत. या मध्ये सेतू बद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. रामचंद्राने लंकेवर स्वारी करण्यासाठी हा सेतू बांधायचे ठरवले. सुग्रीव आणि त्याची वानरसेना यांनी समुद्रात प्रचंड शिळा आणि वृक्ष टाकून सेतू बांधायला मदत केली. अशी सगळी सेतू बांधण्याची प्रस्तावना या पोथीमध्ये दुसऱ्या अध्यायात दिली आहे.

याच्या तिसऱ्या अध्यायात २४ महत्त्वाची तीर्थे सांगितली आहेत. तसेच देवी व महिषासुर युद्ध, देवी आख्यान, स्नान माहात्म्य, ब्रह्मकुंड प्रशंसा, लक्ष्मण तीर्थ प्रशंसा आणि निरनिराळ्या कथा सांगितल्या आहेत.

●●●

# छापील माहात्म्य

## १. गोदावरी माहात्म्य

ही पोथी शके १७९४ मधील आहे. या पोथीमध्ये गोदावरी बद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. भारतातली एक पवित्र नदी. हिचा उगम महाराष्ट्रात त्र्यंबकेश्वर जवळच्या ब्रह्मगिरीवर झाला आहे. हिला 'गौतमी गंगा' असेही म्हणतात. ब्रह्मवैवर्त पुराणात हिच्या उत्पत्तीची कथा दिली आहे. वाल्मिकीला रामायण लिहिण्याची प्रेरणा हिच्याच तीरावर झाली. महाभारतात हिचा सप्त गोदावरी असा उल्लेख केलेला असून, तिच्या तीरावर गोवर्धन, सावित्री, विदर्भ ही तीर्थे आहेत. गोदावरी ही ब्रह्म-विष्णू-महिषात्मक असल्याचे मानले आहे. सर्व नद्यांमध्ये ही वृद्ध व श्रेष्ठ असून, तिच्या केवळ स्मरणाने सर्व पापांचा नाश होतो. असा सर्व महिमा यामध्ये वर्णिला आहे.

## २. नासिक पंचवटी क्षेत्र माहात्म्य

ही पोथी १८२८ सन १९०६ मधील आहे. याचे प्रकाशक व्यंकटेश्वर प्रेस, मुंबई हे आहेत. या मध्ये नासिक मधील पंचवटीचे माहात्म्य वर्णिले आहे. नासिक एक पुण्यक्षेत्र आहे. हे गोदावरीच्या तीरावर वसले आहे. भारतातल्या पाच प्रमुख महातीर्थात याची गणना होते. याला पश्चिम काशी असेही म्हणतात. पंचवटी म्हणजेच पाच पवित्र छायादार वृक्षांचा समूह. पिंपळ, बेल, वड, आवळा, अशोक अशा पाच वृक्षांचा संदर्भ येतो.

रामायणात पंचवटीला पवित्र स्थळ मानले आहे. जिथे राम,लक्ष्मण आणि सीता यांचे वास्तव्य होते. हे क्षेत्र नासिक (नाशिक) मध्ये स्थित आहे. पंचवटी मध्ये अनेक मंदिरे आहेत. या बद्दलची सविस्तर माहिती यात पाहायला मिळते.

## ३. ब्रह्मवैवर्त माहात्म्य

हे एक महापुराण आहे. विष्णू पुराणानुसार हे दहावे पुराण आहे ; तर भागवत व कूर्म पुराण यांच्या मते नववे आहे. प्रारंभी यात ब्रह्मवर्णन होते असे दिसते. पण दुसऱ्या संस्करणात याला कृष्णचरित्र जोडले गेले आणि ब्रह्मवर्णनाला गौणत्व आले. नंतर हे सौर पुराण मानले गेले. आणि शेवटच्या संस्करणात ते पूर्णतया वैष्णव पुराण बनले.

वैष्णव संप्रदायाची कित्येक रहस्ये यात साठविलेली आहेत. वल्लभ संप्रदाय व राधा संप्रदाय यांच्यात ज्या साधनविषयक रहस्याचा प्रचार आहे, त्यांचे मूळ या पुराणात उपलब्ध होते. प्रस्तुत पुराणाचे चार खंड असून त्यांची नावे अशी – १. ब्रह्म खंड २. प्रकृती खंड ३. गणपती खंड ४. श्रीकृष्ण जन्म खंड. या पुराणात एकूण अध्याय २७६ असून, श्लोकसंख्या १० हजार आहे.

## ४. नर्मदा माहात्म्य

या पोथी मध्ये नर्मदेची महती सांगितलेली आहे. ही एक महानदी. नर्म = सुख व दा = देणारी ती नर्मदा अशी तिची उत्पत्ती आहे. हिला रेवा, अमरजा, मेकलकन्या , रुद्रकन्या अशीही नावे आहे. विंध्य पर्वतश्रेणीच्या मेकल नामक डोंगरात नर्मदा उगम पावते व भृगुकच्छाजवळ (भडोच) पश्चिम सागराला मिळते. नर्मदेला भारतवर्षातील सात पवित्र नद्यांपैकी एक मानतात. नर्मदेला प्रदक्षिणा करतात. नर्मदेशिवाय भारतातल्या एकाही नदीची प्रदक्षिणा केली जात नाही. या पोथीमध्ये या सर्वांबद्दल सविस्तर माहिती मिळते.

## ५. कोकिळा व्रत माहात्म्य

ही पोथी शके १८३४ सन १९१२ ला प्रकाशित झाली आहे. यामध्ये कोकिळा व्रताची सविस्तर माहिती मिळते. स्त्रियांचे आवश्यक व्रत व पुरुषाचे काम्यव्रत. आषाढ हा अधिक मास आला असता, त्या मासाच्या पौर्णिमेस या व्रताची सुरुवात आणि श्रवण शु. पौर्णिमेस समाप्ती करतात. कोकिळारूपी गौरी ही या व्रताची प्रधान देवता आहे. नक्तभोजन व पूजा ही यांची प्रधान अंगे आहेत. हे व्रत संपूर्ण एक महिना करणे शक्य नसेल, तर कमीत कमी तीन दिवस तरी करावेच, असे सांगण्यात आले आहे. तसेच या मध्ये उद्यापन व पूजाविधी सांगितला आहे.

## ६. वज्रेश्वरी माहात्म्य

ही पोथी शके १८१८ सन १८९६ मधील आहे. ही एक देवता आहे. हिचे स्थान महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात आहे. ठाण्यापासून हे अंतर सुमारे सव्वीस मैल भरते. वज्रेश्वरी गावाचे मूळ नाव वडवली असे असून, आता ते देवीच्या

नावानेच परिचित आहे. या गावात उल्हास नावाची नदी असून, तिच्या तीरावरच्या एका टेकडीवर देवीचे देऊळ आहे. या पोथीमध्ये वज्रेश्वरी नाव का मिळाले याची कथा सांगितली आहे. वज्रेश्वरी गावाच्या परिसरात गरम पाण्याची अनेक कुंडे आहेत. हे पाणी आरोग्यदायक आहे. अनेक भाविक इथे येतात.

## ७. विनायक माहात्म्य

ही पोथी शके १८५२ सन १९३०मधली आहे. विनायक गणपतीचे एक नाव. गणपती हा हिंदू धर्मातील बुद्धिचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे. विनायक या शब्दाचा अर्थ 'वि' म्हणजे विशिष्टरूपाने जो नायक (नेता) आहे तो. याच अर्थाने गणाधिपती नावही प्रचलित आहे. या पोथीमध्ये गणेशाचे विविध अवतार आणि त्यांची अवतारवर्णनं दिली आहेत. तसेच निरनिराळ्या पुराणातील जन्मकथा यात सांगितल्या आहेत. गणेश पौराणिक हिंदू धर्मातील प्रथम पूज्य व त्या कारणाने एक मुख्य देवता आहे. म्हणून या देवतेचा नाना आख्याना-उपाख्यानांत, वेगवेगळ्या पुराणांत व महाकाव्यांत उल्लेख येतो. गणेशाविषयीची सर्वाधिक महत्त्वाची कहाणी म्हणजे गणपतीचे गजानन होणे होय. प्रत्येक पुराणाच्या वर्ण्यविषयानुसार या प्रसंगावर विविध भाष्येही वाचायला मिळतात. इतकी की, यामुळे पुराणांमध्ये काही ठिकाणी परस्पर-विरोधही दिसतो. याशिवाय गणपतीच्या मातृपितृभक्ती व विवाहाविषयीच्या अनेक कथा वाचायला मिळतात.

## ८. गया माहात्म्य

भारतातील त्रिस्थळी यात्रेतले एक तीर्थ. हे पितृतीर्थ आहे. बिहार राज्यात फाल्गु नदीच्या तीरावर पाटण्यापासून दक्षिणेला ८८ कि. मी. दूर गया नगर वसलेले आहे. गया अतिप्राचीन क्षेत्र आहे. गयेतील मुख्य मंदिर म्हणजे विष्णुमंदिर होय. गयेतील दुसरे दर्शनीय स्थान म्हणजे अक्षय्य वट होय. गया या प्रदेशाची तसेच तेथील मंदिरांबद्दलची सविस्तर माहिती या पोथी मध्ये मिळते.

## ९. वेरूळ माहात्म्य

वेरूळ हे मराठवाड्यातील प्रसिद्ध स्थान आहे. हे गाव औरंगाबादच्या वायव्येला सुमारे अठरा मैलांवर वसलेले आहे. गावाजवळून इला नदी वाहते. तिच्या तीरावर घृणेश्वराचे मंदिर आहे. ते बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक मानले जाते. त्याबद्दलची सविस्तर माहिती आहे. मात्र वेरूळ हे गाव जगद्‌विख्यात झाले आहे ते गावाच्या पश्चिमेला एका मैलावरील डोंगरात खोदलेल्या लेण्यामुळे. भारतातील सर्व लेण्यांत ही लेणी उत्कृष्ट मानली जातात. अशी सर्व वैशिष्ट्ये ही या पोथीमध्ये आहेत.

## १०. हरिहरेश्वर माहात्म्य

कोकणपट्टीतील एक निसर्गरम्य असे पवित्र तीर्थस्थान. एका बाजूला हिरव्यागार गर्द वनश्रीने नटलेला डोंगर तर दुसऱ्या बाजूला नयनरम्य स्वच्छ व निळा समुद्र व रुपेरी वाळूने आकर्षित करणारा अमर्याद समुद्रकिनारा. तसेच नारळी पोफळीच्या बागांच्या साक्षीने आणि डोंगरदऱ्यांच्या कुशीत विसावलेले हे तीर्थस्थान आहे. हरिहरेश्वर, कालभैरव योगेश्वरी, सिद्धिविनायक व हनुमान अशी चार मंदिरे, तसेच समुद्रकिनारी असणारे विष्णूपद, गायत्रीतीर्थ, वक्रतीर्थ, सूर्यतीर्थ, यज्ञकुंड, विष्णुतीर्थ अशी अनेक ठिकाणे आहेत. कर्नाटकातील गोकर्ण ते ठाणे जिल्ह्यातील निर्मळ हे पाचशे मैलांचे दक्षिणोत्तर अंतर व ४८ मैल रुंद एवढा प्रचंड परिसर हा श्री क्षेत्र हरिहरेश्वराचा परिसर मानण्यात येतो. सावित्रिला दिलेल्या वराप्रमाणे ब्रह्मदेवाने सावित्रीसह यज्ञ केला. या हरिहरेश्वर क्षेत्राच्या दक्षिण दिशेला व उत्तर दिशेला बारा ज्योतिर्लिंग स्थाने आहेत. देशात एकूण १०८ तीर्थस्थाने असली तरी प्रमुख तीर्थ हरिहरेश्वर मध्ये आहे असे मानले जाते. हरिहरेश्वरचा महापवित्र क्षेत्र असा उल्लेख ‘श्री हरीहरेश्वर माहात्म्य’ पोथीमध्ये आहे. हरिहरनावाच्या पश्चिमाभिमुख असलेल्या या देवात हरिस्वरूप व हरस्वरूप या दोन्हींचा संगम झाला आहे.

## ११. देवालयग्राम माहात्म्य व व्येंकटेश माहात्म्य

या पोथी मध्ये व्येंकटेशाचे माहात्म्य देऊळगावात देव कशाकरिता आले, कधी आले, या गावात तीर्थ कोणकोणती आहेत, देव कोणते कोठे आहेत हे सर्व विषय आहेत. हे माहात्म्य बह्मांडपुराणी मानसोत्तरखंडामध्ये आहे. या पोथीमध्ये एकूण ६१ अध्याय आहेत.

## १२. डंकपूर माहात्म्य

ही पोथी शके १९६३ सन १९०६ मधील आहे. गुजरात राज्याच्या खेडा जिल्ह्यातील हिंदूंचे पवित्र तीर्थ क्षेत्र आहे. हे पश्चिम रेल्वेच्या आणंदच्या गोध्रा या लोहमार्गावरील आणंदपासून सु. ३२ कि.मी. आहे. तेथे द्वारकाधीशाचे मंदिर असून श्री कृष्णास ‘रणछोडजी’ किंवा ‘डाकोरजी’ असे म्हणतात. फार पूर्वी डंक ऋषी मुनींनी उग्र तपश्चर्येने शंकराला प्रसन्न करून घेतल्यामुळे ते लिंग रूपाने तेथेच राहिले, त्यावरून डंकक्षेत्र – डंकपूर–डाकोर असे नाव पडले. तर याबद्दलची सविस्तर माहिती मिळते.

●●●

# ‘माहात्म्या’वर आधारित पुस्तके

**१. प्रयागराज माहात्म्य**
लेखकः पट्टाभी सीतारमय्या
प्रकाशक : श्री बैधनाथ आयुर्वेद भवन लि.
प्रकाशन ठिकाण : कलकत्ता
प्रकाशन वर्ष : १९५३

**२. त्र्यंबकेश्वर माहात्म्य**
माहिती उपलब्ध नाही.

**३. श्री रेणुका (यल्लम्मा ) देवी माहात्म्य**
लेखकः सिद्धांती शास्त्री
प्रकाशक : पंचवन्निगीबृहन्मठ
प्रकाशन ठिकाण : बेळगाव
प्रकाशन वर्ष : १९८६

**४. श्री यंत्र माहात्म्य**
लेखक : नारायण लक्ष्मण आळवणी
प्रकाशक : भैरव गणेश हेगडे–पाटील
प्रकाशन ठिकाण : कोल्हापूर
प्रकाशन वर्ष : १९६८

**५. श्री पुरुषोत्तम मास माहात्म्य**
लेखक : श्री दासबुवा परुळेकर
प्रकाशक : श्री लक्ष्मण जुन्नरकर
प्रकाशन ठिकाण : मुंबई
प्रकाशन वर्ष : १९५८

**६. श्री नासिक पंचवटी माहात्म्य**
लेखक : त्रिंबक नारायण पुजारी
प्रकाशक : गजानन मुळे
प्रकाशन ठिकाण : मुंबई
प्रकाशन वर्ष : –

**७. श्री क्षेत्र गाणगापूर माहात्म्य**
लेखक : चिदंबर श्रीपादराव कुलकर्णी
प्रकाशक : र. क. कुलकर्णी
प्रकाशन ठिकाण : बेळगाव
प्रकाशन वर्ष : १९७२

**८. श्री मारुती माहात्म्य**
माहिती उपलब्ध नाही.

**९. गायका माहात्म्य**
लेखक : श्री हरी
प्रकाशक : मोतीलाल जालान
प्रकाशन ठिकाण : गोरखपूर
प्रकाशन वर्ष : १९६८

**१०. रुद्राक्ष माहात्म्य और धारण विधी**
लेखक : बाबा औढरनाथ
प्रकाशक : रणधीर बुक सेल्स
प्रकाशन ठिकाण : हरिद्वार
प्रकाशन वर्ष : १८८०

**११. श्री कृष्ण माहात्म्य**
लेखक : विठ्ठल पुनाजी कुबल
प्रकाशक : कुबल
प्रकाशन ठिकाण : मुंबई
प्रकाशन वर्ष : १९०९

**१२. श्री व्येंकटेश माहात्म्य**
प्रकाशक : रा. राममूर्तिशर्मा
प्रकाशन ठिकाण : बंगलोरू
प्रकाशन वर्ष : १९७३

**१३. प्रतिष्ठान माहात्म्य**
लेखक : डॉ. चंद्रकांत धांडे
प्रकाशक : अरुण गं. कुलकर्णी
प्रकाशन ठिकाण : औरंगाबाद
प्रकाशन वर्ष : १९९३

**१४. तन्जपुरी (तंजाऊर) माहात्म्य**
लेखक : भीमा राव
प्रकाशक : वेदी वेलन
प्रकाशन ठिकाण : तंजावर
प्रकाशन वर्ष : १९०८

**१५. श्री मांगीश महात्म्य**
लेखक : पुरुषोत्तम वर्दे
प्रकाशक : पुरुषोत्तम वर्दे
प्रकाशन ठिकाण : मुंबई
प्रकाशन वर्ष : १९३७

**१६. श्री हरिहरेश्वर माहात्म्य**
प्रकाशक : श्री देव हरिहरेश्वर
प्रकाशन ठिकाण : श्रीवर्धन

**१७. श्री करहाटक (कऱ्हाड) माहात्म्य**
संपादक : विजया कुंटे
प्रकाशक : श्री वीरेन्द्र कुंटे
प्रकाशन ठिकाण : पुणे
प्रकाशन वर्ष : १९९७

**१८. श्री करवीर माहात्म्य**
संपादक : ग. वा. तगारे
प्रकाशक : उषा इथापे
प्रकाशन ठिकाण : कोल्हापूर
प्रकाशन वर्ष : १९८०

# ‘माहात्म्य’ साहित्य प्रकाराचे महत्त्व

आपण ज्या देशात व प्रदेशात राहतो त्या प्रदेशाचा एक विशिष्ट भूगोल असतो. ह्या भूगोलामध्ये तेथील नद्या, डोंगर, पर्वत इत्यादींचा समावेश असतो. त्याचप्रमाणे ह्या विविध प्रदेशांमध्ये राहणाऱ्या लोकांची एक विशिष्ट संस्कृती असते. त्यांच्या स्वतःच्या काही सामाजिक परंपरा असतात. तसेच एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोक एखाद्या धर्माचे असतात. हे लोक त्यांच्या धार्मिक परंपरांप्रमाणे आपापल्या देवदेवतांची पूजाअर्चा व विविध सण साजरे करताना आढळतात. अनेकदा असे लक्षात येते की, एखाद्या प्रदेशातील वा देशातील लोक ज्या धर्माचे असतात त्या धर्मातील विविध संकल्पनांवर तेथील भौगोलिक प्रदेशांच्या वैशिष्ट्यांचा प्रभाव पडलेला असतो. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास इस्राएल ह्या देशातील ‘जेरुसलेम’ह्या शहरातील झियॉन व इतर टेकड्यांना तसेच ठिकाणांना फक्त ज्यू धर्मातच नव्हे तर ख्रिस्ती धर्म व इस्लाममध्ये सुद्धा महत्त्वपूर्ण स्थान आहे. याचे कारण म्हणजे वर उल्लेखिलेल्या टेकड्या व ह्या शहरातील इतर काही ठिकाणी ज्यू धर्मियांच्या मते जुन्या करारामधील (Old Testament) कथा व घटना घडल्या होत्या. ख्रिस्ती धर्मियांच्या दृष्टीने येशू ख्रिस्ताचे जीवन ह्याच ठिकाणाच्या वा प्रदेशाच्या आसपास व्यतीत झाले होते. तसेच येशू ख्रिस्ताचा जन्म जेरुसलेमपासून जवळच असलेल्या बेथलेहेम–Bethlehem या ठिकाणी झाला होता असे ख्रिस्त बांधव मानतात. मुस्लिमांची अशी धारणा आहे की, मुहम्मद पैगंबर जेरुसलेम मधील टेकडीवरूनच स्वर्गात गेला होता. यामुळे सद्यस्थितीत ज्यू, ख्रिस्ती व मुस्लीम धर्मिय लोक जेरुसलेम ह्या शहराला फार पवित्र मानतात असे चित्र दिसते. तसेच अरब राष्ट्रे व इस्राएल यांच्यात चाललेल्या तंट्याचे हे एक प्रमुख कारण आहे असे लक्षात येते.

तर आपला मुद्दा असा आहे की, विविध देशांतील लोक एखाद्या विशिष्ट धर्माचे अनुयायी असतात व त्यांच्या धार्मिक विचारांवर व कल्पनांवर तेथील भौगोलिक स्थितीचा प्रभाव पडलेला असतो. भारताच्या बाबतीत आपण पाहिले तर, आपल्या देशातील बहुसंख्य लोक हे हिंदू धर्मीय आहेत. हिंदू धर्माचे एक वैशिष्ट्य म्हणजे आपल्या धर्मात विविध नद्या, वृक्ष, डोंगर, पर्वतरांगा इत्यादींना पवित्र मानलेले आहे व त्यांची पूजा केली जाते. उदहारणच द्यायचे झाले तर, हिमालय हा पर्वत हिंदू धर्मियांच्या दृष्टीने सर्वात जास्त पवित्र पर्वत आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये वा अतिशयोक्ती वाटू नये. हिमालय पर्वताला तर हिंदू धर्मात साक्षात् पार्वती मातेच्या पित्याचे व भगवान शिव

शंकराच्या सासऱ्याचे स्थान दिलेले आहे. भारतामध्ये हिंदू धर्मियांची अनेक पवित्रस्थळे व तीर्थस्थळे आहेत. उत्तरेत जम्मू-काश्मीर ते दक्षिणेत कन्याकुमारीपर्यंत तसेच पश्चिमेत द्वारकेपासून ते पूर्वेकडे बंगाल व आसामपर्यंत हिंदू धर्मियांची विविध पवित्र स्थळे विखुरलेली आहेत. हिंदू धर्मीय ह्या विविध तीर्थस्थळांना वा ठिकाणांना भक्तीभावाने देव-दर्शनासाठी जात असताना वा ह्या ठिकाणांची तीर्थयात्रा करत असताना आढळतात. यातील काही तीर्थयात्रा तर फार प्रसिद्ध आहेत. अशीच एक प्रसिद्ध तीर्थयात्रा म्हणजे उत्तराखंड राज्यातील 'चारधाम यात्रा' ही होय. ह्या यात्रेमध्ये हिंदू भाविक ह्या राज्यातील केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री व यमुनोत्री ह्या चार धामांना वा स्थळांना भेट देत असतात. यातील केदारनाथ हे भगवान शिवाचे धाम, बद्रीनाथ हे भगवान विष्णूचे धाम, गंगोत्री हे हिंदू धर्मातील सर्वात पवित्र नदी गंगेचे उगमस्थान तर यमुनोत्री हे हिंदूंची अजून एक पवित्र नदी यमुनेचे उगमस्थान होय. ही चारही स्थळे हिमालयात अतिशय दुर्गम ठिकाणी वसलेली आहेत. तरीसुद्धा श्रद्धाळू हिंदू आपल्या वयोमानाची सुद्धा काळजी न करता भक्तीभावाने येथे दर्शनासाठी जात असतात. एवढेच काय, तर हिंदू धर्मीय भाविक सध्याच्या तिबेटमध्ये (दुर्दैवाने हा भूभाग सध्या चीन ह्या देशाच्या ताब्यात असून चीनी सरकारने ह्या प्रदेशाला स्वायत्त प्रदेशाचे वा प्रांताचे स्थान वा दर्जा दिला आहे.) स्थित असलेल्या कैलास पर्वत व मानस सरोवराची यात्रा करताना दिसतात. कैलास पर्वताचा उल्लेख अनेक पुराणांमध्ये व महाभारतासारख्या महाकाव्यांमध्ये आलेला आहे. कैलास पर्वत म्हणजे भगवान शिवाचे निवासस्थान आहे असे हिंदू धर्मीय मानतात. त्याचप्रमाणे मानससरोवराची निर्मिती साक्षात विधी म्हणजेच ब्रह्मदेवानेच केलेली असून हे सरोवर म्हणजेच पुराणांमध्ये उल्लेखिलेले भगवान विष्णूचे स्थान अर्थात क्षीरसागर होय असे अनेक हिंदू मानतात. ह्याच क्षीरसागरात भगवान विष्णू शेष नागावर माता लक्ष्मीसोबत वास करत असतात अशी अनेक हिंदूंची श्रद्धा आहे. निदान हिंदू धर्माच्या ग्रंथांमध्ये तसा उल्लेख आल्याचे अनेक अभ्यासक म्हणतात. असो.

तर मुद्दा असा आहे की, हिंदू धर्मियांची पवित्र स्थळे संपूर्ण भारतभर व तसे पाहिले तर सध्याचा पाकिस्तान व बलुचिस्तानापर्यंत पसरलेली आहेत. हिंदू धर्मियांमध्ये अशीदेखील धारणा आहे की, एखाद्या विशिष्ट ठिकाणी एखादी विशिष्ट देवता कायमस्वरूपी वास करीत असते. यामुळेच विविध ठिकाणे हिंदू धर्मियांच्या विविध देवतांशी संबंधीत असल्याचे सांगून, त्या ठिकाणांना एखाद्या विशिष्ट देवतेच्या वा देवतांच्या नावाशी जोडलेले आपल्या निदर्शनास येते. उदाहरणच द्यायचे झाले तर, उत्तर प्रदेशातील गंगा

नदीच्या तीरावर वसलेले काशी हे ठिकाण भगवान शिव शंकराशी निगडित आहे. अनेक ग्रंथांमध्ये असा उल्लेख आलेला आहे की, काशी ही नगरी साक्षात भगवान शिवाने निर्माण केलेली आहे व तेथे भगवान महादेवाचा कायमस्वरुपी वास असतो. एवढेच काय, परंतु प्रलय येऊन संपूर्ण जग जरी बुडाले तरी काशी नगरी कधीच बुडू शकत नाही; कारण ती भगवान शिवाच्या त्रिशूलावर वसलेली आहे अशी हिंदुंची निस्सीम श्रद्धा आहे. महाराष्ट्रापुरता विचार केला तर कोल्हापूर, तुळजापूर, आंबेजोगाई, माहूर, नाशिक, पैठण, पंढरपूर इत्यादी ठिकाणी हिंदू धर्मियांची तीर्थस्थळे आहेत.

हिंदू धर्मीय भाविक ह्या विविध ठिकाणांची तीर्थयात्रा करताना आढळतात. पंढरपूर येथे महाराष्ट्राचे दैवत विठोबा माउलीचे मंदिर आहे. विठोबाचा उल्लेख साधारणतः १२ व्या शतकापासून विविध ग्रंथांमध्ये येताना आढळतो असे अभ्यासकांचे मत आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या वारकरी ह्या वैष्णव पंथातील लोक तर दर आषाढी एकादशीला व कार्तिकी एकादशीला मोठ्या भक्तीभावाने दिंडी घेऊन पंढरपूरला जात असतात.

ह्या विविध स्थळांचे वा तीर्थक्षेत्रांचे एक स्वतःचे माहात्म्य आहे. ही स्थाने का पवित्र आहेत व त्यांच्याशी कोणती देवी वा देव निगडित आहेत ही माहिती आपणास विविध ग्रंथ व स्तोत्रांतून मिळते. अशा प्रकारची एखाद्या स्थळाची महती व प्रामुख्याने ह्या लेखाचा गाभा विचारात घेता धार्मिक महती वर्णन करणाऱ्या वा एखाद्या ठिकाणाचे धार्मिक महत्त्व विशद करणाऱ्या ग्रंथांना ‘माहात्म्य’ साहित्य म्हणणे वावगे ठरू नये. अशा ग्रंथांमध्ये एखाद्या ठिकाणी वा तत्सम ठिकाणी असलेले मंदिर, पवित्र नदी वा नद्या, पवित्र जलाशय (तीर्थे), मंदिराचे स्थापत्य, तेथील इतर महत्त्वाची मंदिरे, मठ व विविध मठांचे मठाधिपती त्यांची गुरुशिष्य परंपरा, आख्यायिका, जत्रा वा यात्रा इत्यादींबाबत माहिती दिलेली असते. त्याचप्रमाणे हे ठिकाण भौगोलिक दृष्ट्या कोणत्या जिल्ह्यात, कोणत्या दिशेला आहे, तसेच त्या ठिकाणचे मंदिर विशिष्ट दिशेलाच का वसलेले आहे, इत्यादींबाबतची माहिती मिळते. अशा ग्रंथांना वर उल्लेखिल्याप्रमाणे माहात्म्य साहित्य तसेच त्यात दिलेल्या माहितीला त्या ठिकाणाचे ‘स्थल माहात्म्य’ असे म्हणतात. अशा स्थल माहात्म्यांचा उपयोग अभ्यासकांना संशोधन करण्यासाठी व प्रामुख्याने धार्मिक क्षेत्रातील संशोधन करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात होतो. उदाहरणच द्यायचे झाले तर महाराष्ट्रातील एक थोर संशोधक श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनी तुळजापूरची तुळजा

भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, शिखर शिंगणापूरचा श्री शिवशंभू महादेव इत्यादी महाराष्ट्रातील हिंदू धर्मियांच्या श्रद्धास्थळांवर व तीर्थक्षेत्रांवर माहितीपूर्ण पुस्तके नव्हे ग्रंथ लिहिलेले आहेत. ह्या ग्रंथांमध्ये तेथील देवता व मंदिरांची माहिती देताना रा. चिं. ढेरेंनी त्या स्थळांचे माहात्म्य व तेथील विविध पवित्र वास्तू तसेच मंदिरे नेमकी कोठे आहेत तसेच तेथील पुजारी कोण आहेत याविषयी इत्यंभूत माहिती दिलेली आढळते. रा. चिं. ढेरे लिखित 'श्री तुळजाभवानी' या ग्रंथातील पहिलेच प्रकरण – 'श्रीक्षेत्र तुळजापूर : एक नित्यजागृत शक्तिपीठ' म्हणजे स्थळ माहात्म्याचे उत्तम उदाहरण होय. रा. चिं. ढेरेंचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते नियोजित ग्रंथाचे लेखन करण्यापूर्वी त्या त्या ठिकाणाना स्वतः भेट देत असत व ते त्या स्थानाशी निगडित लोकांच्या, तेथील नागरिकांच्या, मंदिरातील पुजाऱ्यांच्या, तीर्थकरूंच्यादेखील मुलाखती घेत व तेथील मंदिरे स्वतः पाहून येत असत. एवढेच नव्हे तर, त्यांनी विविध पुराणे व महाभारतासारखी काव्ये व त्यातील स्थळ माहात्म्यांचा मोठ्या खुबीने आपल्या संशोधनासाठी व लेखनासाठी वापर केलेला आढळतो. रा. चिं. ढेरेंनी आपले संशोधनपर लिखाण करताना इतरांनी लिहिलेल्या स्थळ माहात्म्यांचादेखील उपयोग केलेला असल्याचे निदर्शनास येते. त्यांनी 'श्री तुळजाभवानी' हा शोधग्रंथ लिहिताना इतर अनेक साधनांसोबतच क. भ. प्रयाग लिखित 'श्रीक्षेत्र तुळजापूर माहात्म्य', कृ. ग. कवचाळे लिखित 'आमचे देवास' तसेच गोविंद हरी फडके लिखित 'माझी तीर्थयात्रा' इत्यादी स्थळ माहात्म्यांचा संदर्भ घेतलेला असल्याचे आढळते.

रा. चिं. ढेरेंप्रमाणेच अमेरिकेतील डायना एल. येक (Diana L. Eck) तसेच ॲने फेल्डहॉस (Anne Feldhaus) यांनी त्यांच्या हिंदू धर्माबाबतच्या विविध ग्रंथांचे संशोधन व लिखाण करताना स्थळ माहात्म्यांचा वापर केलेला आढळतो. डायना एल येक यांची 'इंडिया–अ सेक्रेड ज्यॉग्राफी' (India: A Sacred Geography), 'बनारस– सिटी ऑफ लाईट' (Banaras : City of Light) इत्यादी हिंदू धर्माशी निगडित अतिशय माहितीपूर्ण ग्रंथांचे लिखाण केलेले आहे. डायना येक ह्या ग्रंथांच्या लिखाणासाठी संशोधन करण्यासाठी जातीने भारतात आलेल्या होत्या. त्याचप्रमाणे त्यांनी स्थळे माहात्म्यांचा देखील अभ्यास केलेला होता. ॲने फिल्डाहॉस तशा अमेरिकेतील ॲरिझोना ह्या राज्यातील ॲरिझोना विद्यापीठातील धार्मिक अध्ययन ह्या विषयाच्या प्राध्यापिका होत. ह्या विदूषीने महाराष्ट्रातील नद्यांच्या सामाजिक व धार्मिक महत्त्वाच्या व माहात्म्यांच्या अनुषंगाने 'वॉटर अँड वूमनहूडः रिलीजीयस मीनिंग्ज् ऑफ रिव्हर्स इन महाराष्ट्र' – Water and Womanhood: Religious Meanings of Rivers in Maharashtra हा ग्रंथ लिहिलेला आहे. ह्या ग्रंथाचे

मराठीत 'नदी व स्त्रीत्व' या शीर्षकाने भाषांतर देखील झालेले आहे. हे भाषांतर विजया देव यांनी केलेले आहे.

ॲने फेल्डहॉस यांचा अजून एक महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणजे 'कनेक्टेड प्लेसेस : रिजन, पिलग्रीमेज अँड ज्यॉग्राफिकल इमॅजीनेशन इन महाराष्ट्र' – Connected Places: Region, Pilgrimage and Geographical Immagination in India हा होय. हा ग्रंथदेखील स्थळ माहात्म्याचे उत्तम उदाहरण म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सुरींदर मोहन भारद्वाज यांचा 'हिंदू प्लेसेस ऑफ पिलग्रीमेज् इन इंडिया' (Hindu Places of Pilgrimage in India) हा ग्रंथदेखील स्थळ माहात्म्याचे उदाहरण होय असे म्हणावे लागेल. भारद्वाजांनी आपल्या ह्या ग्रंथाचे लिखाण करतानासुद्धा अनेक स्थळ माहात्म्यांचा संदर्भ म्हणून वापर केलेला आहे.

स्थळ माहात्म्य हे प्रामुख्याने त्या स्थळाच्या धार्मिक महत्त्वाबाबत माहिती देत असले तरी त्यातून त्या ठिकाणाची इतर माहितीसुद्धा मिळते. अशा ग्रंथांतील माहितीचा उपयोग इतिहासकारांनासुद्धा इतिहास लेखन करताना निश्चितच होतो यात वाद नाही. फक्त मुद्दा असा आहे की, इतिहासकारांना स्थळ माहात्म्यांतील माहिती इतर समकालीन साहित्य तसेच इतर अधिकृत साहित्यामध्ये आलेल्या माहितीसोबत तुलना करून वा तुलनात्मक अध्यास करून तसेच तपासून वापरावी लागते. एखाद्या स्थळाचे इतिहासात असलेले महत्त्व का आहे याची माहिती मिळविण्यासाठी स्थळ माहात्म्य उपयोगी पडते. त्याचप्रमाणे स्थळ माहात्म्याशी निगडित असलेल्या आख्यायिका व इतर कथा, तसेच ह्या आख्यायिका व देवतांपासून ऐतिहासिक व्यक्तींनी घेतलेली प्रेरणा व त्या विविध स्थळांवर विविध काळात राज्य केलेल्या राजघराण्यांची माहिती स्थळ माहात्म्यावरून इतिहास संशोधकांना मिळू शकते. निदान एखाद्या ऐतिहासिक पुरुषाच्या जीवनात एखाद्या देवतेचे वा तीर्थस्थळाचे महत्त्व का असावे हे कळण्यासाठी वा समजण्यासाठी देखील स्थळ माहात्म्यांचा उपयोग होतो असे म्हणणे वावगे ठरू नये. उदाहरणादाखल छत्रपती शिवाजी महाराजांचे येथे उदाहरण देता येईल. शिवरायांना तुळजापूरची भवानी प्रसन्न होती व जेव्हा शिवरायांनी स्वराज्य स्थापण्याचे ठरविले तेव्हा त्यांना शत्रूंविरुद्ध लढण्यासाठी भवानी मातेने एक तलवारसुद्धा दिली अशा आशयाची कथा आपण अनेकांकडून ऐकतो. ह्या मुद्याला अनुसरून आपण तुळजापूर व तुळजापूरच्या भवानीच्या माहात्म्याविषयी वाचल्यानंतर शिवरायांना भवानी माता प्रसन्न झाली होती असे का म्हटले गेले असावे

याचा उलगडा होतो. तुळजापूरच्या भवानी मातेने महिषासुराचा वध केला होता अशी माहिती आपणास तुळजापूर स्थळ माहात्म्याद्वारे मिळते. त्यामुळे भवानी मातेने ज्याप्रमाणे असुरांचा वध केला त्याप्रमाणेच शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या शत्रूंचा नायनाट केला अशा प्रकारची तुलना झाली असावी व यातून रणांगणावर शौर्य गाजविण्यासाठी मातेचा शिवरायांना वरदहस्त असावा ही कल्पना वा कथा पुढे आली असावी. त्याचप्रमाणे शिवराय हे निस्सीम शिवभक्त (महादेव) व भवानी मातेचे भक्त होते हा मुद्दा देखील येथे महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे तुळजापूरची भवानीमाता, तेथील स्थळ माहात्म्य व शिवरायांचा अभ्यास करताना ह्या दोहोंमधील तुलना करणे सयुक्तिक ठरते.

स्थळ माहात्म्यांप्रमाणेच हिंदू धर्मातील विविध व्रते व पूजा यांचे देखील माहात्म्य सांगणारी काही पुस्तके वा ग्रंथ आपणास उपलब्ध आहेत. ह्याबाबतीत अगदी सोपे व सरळ उदाहरण द्यावयाचे झाल्यास वि. के. फडके लिखित 'संपूर्ण चातुर्मास' ह्या हिंदूंच्या रोजच्या वापरात उपयोगी पडणाऱ्या ग्रंथाचे उदाहरण देता येईल. ह्या ग्रंथात फडक्यांनी हिंदु धर्मियांचे विविध सण, पूजा व व्रतांची माहिती व माहात्म्य सांगितले आहे. त्याचप्रमाणे फडक्यांनी ह्या ग्रंथात हिंदू धर्मियांच्या दिनदर्शिकेतील वा पंचांगातील विविध महिन्यांचे माहात्म्यदेखील सांगितलेले आहे. ही माहिती सर्वसामान्य हिंदूंना त्यांच्या रोजच्या धार्मिक विधी व पूजा-अर्चा करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. अगोदर नमूद केल्याप्रमाणे स्थळ माहात्म्य व एखाद्या ठिकाणाचे धार्मिक माहात्म्य समजल्यानंतर एखाद्या विशिष्ट देशातील समाजात त्या स्थळाविषयी काय महत्त्व आहे व ती त्या समाज गटाच्या भावनिक विश्वात महत्त्वाची का असतात हे समजण्यासाठी मदत होते. असे म्हटले जाते की, तिसऱ्या पानीपतच्या लढाईच्या वेळी (इसवी सन १७६१) महाराष्ट्रातून सैनिकांव्यतिरिक्त इतर लोकसुद्धा उत्तर भारतात गेले होते. कारण उत्तर भारतात हिंदू धर्मियांची विविध तीर्थस्थळे आहेत. ह्या लोकांना वाटले असावे की, त्यांना ह्या पवित्र स्थळांचे दर्शन घेता येईल.

स्थळ माहात्म्याबाबत विल्यम डॅलरीम्पल (William Dalrymple) लिखित 'फ्रॉम द होली माऊंटेन' - From The Holy Mountain ह्या पुस्तकाचेदेखील उदाहरण देता येईल. विल्यम डॅलरीम्पल हे मूळचे स्कॉटिश वंशाचे. ह्या सिद्धहस्त लेखकाने 'द लास्ट मुघल' - The Last Mughal तसेच 'व्हाईट मुघल्स् : लव्ह अँड बिट्रेयल इन एटीन्थ सेंच्युरी इंडिया' - White Mughals: Love and Betrayal in Eighteenth Century

India इत्यादी अभ्यासपूर्ण ग्रंथांचे देखील लिखाण केले आहे. विल्यम यांनी आपल्या 'फ्रॉम द होली माऊंटेन' (From the Holy Maintain) ह्या पुस्तकात प्रामुख्याने सध्याच्या इस्राएल तसेच इजिप्त व तुर्कस्तान इत्यादी पश्चिम आशियाई देशातील ज्यू, ख्रिस्ती व मुस्लीम धर्मियांच्या विविध पवित्र स्थळांची माहिती दिलेली आहे. ह्या ग्रंथातून आपणास स्थळ माहात्म्याविषयी निश्चितच माहिती मिळते. ब्रिटिश काळात विविध प्रांतांतील जिल्ह्यांची माहिती देणारे स्थलवर्णन-कोश (गॅझेटीअर्स) संकलीत करण्यात आले होते. हे स्थलवर्णन-कोश म्हणजे स्थल माहात्म्याचे एक उदाहरण होय असे म्हणणे वावगे ठरू नये. याचे कारण स्थलवर्णन कोशांमध्ये तत्सम भू-भागातील ठिकाणाच्या विविध स्थळांची भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, पारंपरिक, ऐतिहासिक, धार्मिक इत्यादी प्रकारची माहिती दिलेली असते. आपणास मुंबई व ठाणे जिल्ह्यांच्या स्थलवर्णन कोषांवरून येथील स्थळ माहात्म्यांविषयक माहितीसुद्धा मिळते.

विविध ठिकाणांविषयीची भौगोलिक, सांस्कृतिक व धार्मिक माहिती मिळविणे व त्याचा तेथील समाजजीवनावर ऐतिहासिकदृष्ट्या कसा प्रभाव पडला ह्याचा अभ्यास करणे ही खरोखरच अतिशय रोचक बाब असते. नव्हे, अशा तऱ्हेचा अभ्यास एक प्रकारचा वेगळाच आनंद व अनुभव देऊन जातो. डायना एल्. येक, ॲने फेल्डहॉस ह्या विदुषींनी व सुरिंदर मोहन भारद्वाज, रा. चिं. ढेरे ह्या विद्वानांनी निश्चितच हा आनंद लुटला असणार व आपणा वाचकांनासुद्धा त्यांनी आपल्या लिखाणातून त्याची अनुभूती करून दिलेली आहे यात वाद नाही.

ठाण्यातील 'प्राच्यविद्या अभ्यास संस्था' म्हणजे ज्ञानाचे भांडार होय. डॉ. विजय बेडेकरांनी ही संस्था अथक परिश्रमातून उभी केली आहे. त्यांनी देश-विदेशात जावून, महाराष्ट्राच्या दुर्गम खेड्यापाड्यांत जावून दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, पुरातन मूर्ती गोळा केलेल्या आहेत व प्रामुख्याने ठाणेकरांना व एकंदरीतच सर्व अभ्यासकांना हे दर्जेदार दालन उघडे करून दिले आहे. ठाणेकरांनी डॉ. विजय बेडेकरांचे खरोखरच शतशः आभार मानले पाहिजेत. त्याचप्रमाणे ठाणे महानगरपालिकेचे सध्याचे आयुक्त श्री. संजीव जयस्वाल यांनी सुद्धा डॉ. विजय बेडेकरांना प्राच्य विद्या संस्थेबाबत सहकार्य केल्याबद्दल त्यांचेदेखील आभार मानायला हवेत. डॉ. विजय बेडेकरांनी ठाणेकरांना 'माहात्म्य' साहित्याचे व हस्तलिखितांचे दिनांक ६ फेब्रुवारी २०१८ ते २० फेब्रुवारी २०१८ या कालावधीत प्रदर्शन भरवून एक अप्रतिम नजराणा दिला आहे. ठाणेकरांनी ह्या प्रदर्शनास भेट देऊन ह्या

ज्ञानरूपी अमृततुल्य ठेवीचा आस्वाद घ्यावा हीच माफक अपेक्षा. डॉ. विजय बेडेकरांचा समाजात ज्ञान वृद्धींगत करण्याच्या ह्या प्रयत्नांना ईश्वरानेसुद्धा मदत करून ठाण्यातील प्राच्य विद्या संस्था, सर्वसामान्य वाचक, अभ्यासक व संशोधकांच्या दृष्टीने उत्तरोत्तर अत्यंत उपयुक्त बनविण्याच्या त्यांच्या अथक परिश्रमांना आशीर्वाद व कृपाप्रसाद द्यावा ही ईश्वरचरणी प्रार्थना..

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email: subhashinscotland@gmail.com

●●●

# Multi-dimensional Utility of Mahatmya Literature

Any documentation on a particular place, especially religious normally begins with Skanda Purane, Revakhande. It is a sort of Wickipaedia of our legendary historians. Mahatmya literally means magnanimity or magnificence. If we visit any Teertha or kshetra of Bharata-varsha, booklet about that place, is available on temple-stalls. From historical point of view, authenticity, verification, corroboration are important aspects. Often, devotion is loaded with superstition and gullibility or innocence. In Maharashtra, there are Tirthakshetras like Nasik, Karavira, i.e. Kolhapur and Prtishthan, i.e. Paithan. There are authentic books compiled by Itihasa Sankalan Samiti and edited by eminent scholars like Dr. Shantaram Bhalchandra Deo, Dr. Anand Damle and Dr. Morvanchikar. Those books are entitled : Through the ages. Such documents are available on Varanasi, Ujjain, Sarjuparin etc. in north and Melkote through the ages in south. Like Puranas, Agamas, i.e. temple oriented scriptures, especially Pancharatra, Vaishnava Agama, which are precisely dated, contain valuable information about well known Tirthakshetras. The three classical Samhitas of Pancaratra Agama are :1. Satvata(c.200 a.d.), 2. Paushkara (c.300 a.d.) and 3. Jayakhya(450 a.d.). Of these three gems : Ratnatraya, Paushkara Samhita has furnished a list of holy places, beginning from Pushkara near Udaipur and ending with Kurukshetra in Haryana. It covers major part of Bharatvarsha. The description therein tallies with geographical location as found in present times. The valuable reference in this text is : mlecchanam teshu desheshu sthitah kshetradayahni ye| Sankarya pariharena drashtavyah te sadaiva hi || It means that even around 3rd century, there were sacred places of Hindus located in some countries belonging to Mlecchas and seers recommended Hindu devotees to visit those places constantly by taking some sectarian precautions. In present times, there are sacred places of Hindus in Pakistan and Bangla Desh. Prasannakumar Acharya has referred to a temple in his native place in east Bangal which he renovated in 1934.

There is an appended chapter printed along with Jayakhya Samhita named Adhikah Pathah and entitled Hastigirimahatmya. It gives valuable structural information about Varadaraja Vishnu temple in Vishnukanchi. In addition it gives information about four Svyamvykta, i.e. self-emanated

Kshetras of Vishnu having different names. The first among those is Yadugiri or Yadavachala,i.e. Melukote in Karnatak. The deity is Narayana and eight syllabic Mantra is Om namo Narayanaya. Its sovereign scripture is Satvat Samhita : Satvatam yadushailendre samrajyam adhitishtati. Its thematic elucidation is fond in Ishvara Samhita (c. 600 a.d.). It contains a chapter (XX) named Yadavachala Mahatmya. In addition to legendary information it gives valuable information about temple components and deities sculpted there over. Traditionally it is used as executive manual : karyakari pracharyate. Sampatkumara Bhattacharya (age 93) has attested this temple iconic concordance. Satvat Samhita with English translation along with authentic commentary (2 vol.) is published by Academy of Sanskrit research, Melukote. Its commentary Ishvara Samhita with Bhashya (5 vol.) is published with translation by Indira Gandhi Kala Kendra, Delhi. The second classical text : Paushkara Samhita is published with translation by Rashtriya Sanskrit Vidyapeeth, Tirupati. Its commentary : Parameshvara Samhita (700 a.d.) was published from Shrirangam in 1952. The editor A. Govindacharya who was himself a priest has added an appendix of 202 iconic deities available on various layers and niches of temple structure of Ranganath. In this temple Paushkara Samhita is regarded as sovereign scripture (samarajyam adhitishthati). Its commentary Arthopapadika : Parameshvara Samhita is executive (karya-kari) manual. It contains valuable information about the huge temple of Ranganatha, having seven enclosures and 28 (7 x 4) tower-gates : Gopuras. It occupies entire island created by ancient bifurcation of the bed of Kaveri river. The Agamic convention is one aspect and temple-architecture is another. Historical investigation is still another. Historically it may be guessed that two-dimensional diagram worship preceded idol worship. At that time, god might have been invoked and adored in diagrams called Yantra, Bhadra or Mandala. In Paushkara Samhita, one line runs as: tatra mukhyasanam madhye, meaning: there is main seat, in the centre of Mandala. The patha-bheda reads: tatra Murtyasanam madhye, meaning: there is a seat for idol, in the centre. This might have been a transition, at the time of Paushkara Samhita, i.e. around 300 A. D. Mandala accommodated an icon, in place of abstract conception of god. In course of time, Mandala diagrams served as site-plans of notional shrines. Thus, first four Mandalas of Padmodara type of Paushkara Samhita: 1.Sarvato-bhadra (7x7=49) 2. Agha-nirmochana (8x8=64) 3. Sadadhva (9x9=81) and Dharmakhya (10xxxx10=100), were apparently

used as site-plans; and Three dimensional Shalas (sanctums), took shape to enshrine images. It is a potential inter-disciplinary M. Phil or Ph.D. topic. Those chambers are said to have four-doors: chatur-dwara; and situated on outermost enclosure-wal of Ranganatha temple. That temple is so big that tourist buses roam up to third enclosure. Search of those shalas has to succeed prior to research. Dr, A. Srivatsan, now teacher in IIT Chennai, got his Ph.D. on temple-township of Sriranam.

Now, coming back to Mahatmyas, especially Sriranga-mahatmya, ch. 10 of Parameshwara Samhita, it may be said as: This chapter narrates in Pauranic style that Brahma himself constructed and presented enshrined sleeping idol of Vishnu i.e. Rananatha and presented it to Ikshvaku, the doyen of solar race and ancestor of Shri Rama. It was in Ayodhya palace, in daily worship. After victory of Rama over Ravana, Rama and Seeta went back to Ayodhya in Pushpaka Vimana. Thereafter, Bibhishana apparently again flew to Ayodhya, for Rama's coronation. After coronation, Rama conferred presents to dignitaries. Bibhishana opted for Ranganatha idol, which Rama happily presented. The storey further relates that Bibhshana wished to take it to Lanka. Yet, by noon, he landed on the bank of Kaveri, near Chandra Pushkarini. After Madhyahna Sandhya-vandana, he wished to lift the icon and proceed to Lanka. But the event that happened was the repetition of the event which took place, while Ravana was carrying Shiva Linga, as reported in Gokarna-Mahatmya. There, Ganapati apparently diverted Ravana's attention and Shiva did not go to Lanka. Similarly , in Srirangam, Lord Raganatha, himself refused to oblige Bibhishana. As per that Sriranga-mahatmya, Sri Rananatha told Bibhishana, that he liked the place; and instructed him to build a shrine and settlement for priests: Archakas, for worship. As per, that Parameshvara Samhita, Rananatha, curtly asked him to proceed to Lanka, alone: Lankam gaccha nishachara. When shocked Bibhishana kept on wallowing, he assured him, that he will recline there, by keeping his graceful glance, directed at him: Shayanah aham ramsye tvam abhivikshya cha. This storey is corroborated and supplemented in Yadavacala Mahatmya, in Ishvara Samhita. There the storey continues as: In order to console, Rama, Brahma sent to him another image, apparently Narayana. After generations, one princess of Raghu-kula, was given in marriage to a prince in Yadu-kula. The puja idol went to Yadu dynasty, at Yadu-giri, as wedding gift.


This is legendary aspect of information, is available in Mahatmyas. Now, research angle. First point is: it is injustice to Vishvakarma's sculptural heritage. To stamp any image or temple, as Swayam vyakta, denies hundreds of Stapatis and thousands of skilled sculptors their credit. In order to tell the society, the contribution of iconographers, Late Padma-vibhushan Dr V Ganapati Sthapati, had to write a book: who created God. Next point is the location and orientation of Srirangam temple. First point is Srirangam less than hundred kilometers from present Sri Lanka. Second point is present Sri Lanka is not to exact southwards but little southeastwards. It is because, when we keep mariner compass in front of the Gargha-gruha, the needle tilted little towards east. Third point is the Srirangam shrine is exeption to normal convention orientation of temples i.e. eastwards. Obviously, it is to fulfill the promise, given by God to devotee i.e. Rananatha to Bibhishana: I shall keep my glance directed towards you. Research, by field-work in situ, shows that the eye line of reclining Ranganatha passing through present door of the sanctum, in the centre, if stretched towards present Lanka would certainly touch Sri Lanka shore, either near Colambo or Jafna or Batti kalua. Another important inference is: Present Sri Lanka is Ravana's Lanka, built by Maya in Tretayuga. It can be safely said that Three eminent engineers of Treta epoch; Manu, Maya and Nala built three monuments: Ayodhya, Lanka and Rama-setu. All those have much present day relevance. Now, off the record and very much in Mahatmya context, an anecdote: Late Doctor V. Ganapati Stapati (who was awarded doctorate by no Indian University, but by Mahashi Mahesh Univrsity, Holland) used to say: 'That Ganapati prevented Ravana from carrying ShivaLinga to Lanka and Ranganatha Himself declined to be carried by Bibhisana to Lanka. But this Ganapati (Stapati) will carry Ranganatha to SriLanka.' The background is: Tamil Hindu devotees planned to build a huge shrine of Ranganatha. The then president Madam Chandrika Kumaratunge had donated a spacious site for that; and Ganapati Sthapati had completed the assignment of sculpting a huge Idol of Shesha-shayi Vishnu: Ranganatha, worth few crores. Alas! Idol lies in Mahabalipuram workshop. Chandrika's regime is gone! Ganapati Sthapati is no more. Isvareccha baliyasi!

Iti sham.


**Dr Prabhakar Apte**

M.A. Ph.D. LL.M. Advocate

●●●



देवी 'माहात्म्य'



तुलसी 'माहात्म्य'